खडकपूर्णा प्रकल्प ता.देऊळगाव राजा जि.बुलढाणा या प्रकल्पास चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्र. सुप्रमा २०१७/प्र.क्र. ४१४/२०१७/मोप्र-२

मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दिनांक : ०३ मे, २०१८.

पहावे :- १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/(३५/२०१५)/जसं(आ) दिनांक ९ सप्टेंबर, २०१५.

२. शासन शुद्धिपत्रक क्र. संकीर्ण-२०१५/(३५/२०१५)/जसं(आस्था) दिनांक २२ जून, २०१६.

३. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे पत्र जा.क्र.९७६९/ विपाविम /कातां- ३ (२)/खडकपुर्णा/सुप्रमा/२०१७, दि. २४/१०/२०१७.

प्रस्तावना :-

खडकपूर्णा प्रकल्प विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर, अंतर्गत अमरावती विभागातील सिंचन अनुशेष क्षेत्रातील असून बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगांव राजा तालुक्यातील गारखेड गावांजवळ गोदावरी खोऱ्यातील पूर्णा उपखोऱ्यात खडकपूर्णा नदीवर बांधण्यात येत आहे. या प्रकल्पाद्वारे बुलढाणा जिल्हयातील देऊळगांव राजा या तालुक्यातील ६५ गावांमधील ९,३३८ हे. क्षेत्र, सिंदखेड राजा या तालुक्यातील ९ गावांमधील १,९७२ हे क्षेत्र व चिखली तालुक्यातील २६ गावांमधील ९,४१० हे क्षेत्र असे एकूण ३ तालुक्यातील १०० गावांमधील २०,७२० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

सदर प्रकल्पास शासनाने मूळ प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्र. केपीडी/ १०८९/०८/४७, दि.१६.०८.१९८९ अन्वये रू. ७९.५५ कोटी किंमतीसाठी, प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्र. खडक १२९४/ ३५६/ मोप्र-२, दि. १५.०१.२००२ अन्वये रू. ३६८.८८ कोटी किमतीसाठी, द्वितीय सु.प्र.मा. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर, यांचा महामंडळ निर्णय क्रमांक विपाविम/कातां-३/२५६१/व्दितीय सुप्रमा/ (१७/२००६), दि.२९.०८.२००६ अन्वये रू. ६६९.४० कोटी किमतीसाठी व तृतीय सु.प्र.मा. महामंडळ निर्णय क्रमांक विपाविम/कातां-३/५५३/खडकपुर्णा/तृसुप्रमा /२००९, दि. २४.०६. २००९ अन्वये रु. १०९५.९२ कोटी किमतीसाठी प्रदान केली आहे. सदर प्रकल्पावर मार्च २०१७ अखेर पर्यंत रु. ११६८.५६ कोटी खर्च झाला आहे. प्रकल्पाची सिंचन क्षमता २६,६३४ हे. इतकी आहे. प्रकल्पातील धरणाची घळभरणी २००८ मध्ये करण्यात आली असून ऑक्टोबर २०१३ अखेरपासून पूर्ण क्षमतेने जलसाठा निर्माण करण्यात आला आहे. आता रु. १३७४.६० कोटी (दरसूची २०१६-१७) इतक्या किंमतीचा चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी संदर्भ ३ अन्वये सादर केला आहे.

संदर्भ क्र.१ चे शासन निर्णयानुसार विदर्भ व मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार संबंधित सिंचन विकास महामंडळास प्रदान करण्यात आले आहेत. तथापि सदर शासन निर्णयातील परिच्छेद ४ नुसार नियामक मंडळाने सु.प्र.मा. प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या विचारार्थ सादर करावा असा निर्णय घेतल्यास सु.प्र.मा. प्रस्ताव मा.मंत्रीमंडळास सादर करणेची तरतूद आहे.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर, यांच्या दि.१९/०६/२०१७ रोजी झालेल्या नियामक मंडळाचे बैठकीत सदर चतुर्थ सु.प्र.मा. देणेचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या विचारार्थ सादर करावा असा ठराव पारित झाला असल्याने सदर प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या दि. १५.३.२०१८ च्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आला होता.

मा.मंत्रीमंडळाने बांधकामाची सद्य:स्थिती, किंमतवाढीची कारणमीमांसा इ. बाबींचा परामर्श घेऊन खडकपूर्णा प्रकल्पाच्या जलसंपदा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग दरसुची २०१६-१७ वर आधारित रु. १३७४.६० कोटी किंमतीच्या चतुर्थ सुधारित प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय -:

खडकपूर्णा प्रकल्पाच्या (जलसंपदा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१६-१७ च्या दरसूचीवर आधारित) रु. १३७४.६० कोटी किमतीच्या सुधारित प्रकल्प अहवालास (प्रत्यक्ष कामासाठी एकूण रू. १२९९.१८ कोटी व अनुषंगिक खर्च रू. ७५.४० कोटी) खालील अटींच्या अधीन राहून चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रकल्पाच्या उपशिर्षनिहाय तरतुदींचा गोषवारा परिशिष्ट "अ" मध्ये सोबत जोडला आहे.

१) उपलब्ध निधीचे विरळ स्वरुपातील वाटप/विभागणी (Thin spreading) टाळण्याच्या दृष्टीने राज्य तांत्रिक सल्लागार समितीचा अहवाल विचारात घ्यावा व त्यानुसार प्रकल्प घटकाच्या कामावरील गुंतवणुकीचा प्राधान्यक्रम निश्चित करुन कामे करावीत.

२) प्रकल्पात जलाशयातून स्वखर्चाने उपसा करुन २०००हे. क्षेत्र सिंचित करण्याची तरतूद आहे. त्यामुळे पुन्हा जलाशयावरुन प्रवाही / उपसा सिंचनासाठी परवानग्या देवू नयेत.

३) प्रकल्पावर ज्या ठिकाणी वितरीका / लघुकालवे यांची कामे हाती घेतलेली नाहीत, अशा ठिकाणी बंद नलिकेद्वारे सिंचन करण्याचा पर्याय वापरावा.

४) प्रकल्पाच्या एकूण २६,६३४ हे. लाभक्षेत्रापैकी (लागवडीलायक क्षेत्र) १७८६१ हे. लाभक्षेत्र अधिसूचितत केले असून उर्वरित ८,७७३ हे. लाभक्षेत्र अधिसूचित करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

५) खडकपूर्णा प्रकल्पांतर्गत असलेल्या सर्व उपसा सिंचन योजनांतर्गतच्या पंपाच्या परिचालनासाठी होणारा आवर्ती खर्च कमी करण्याच्या दृष्टीने तसेच योजनेच्या शाश्वत स्वरुपातील परिचालनासाठी सौर उर्जेचा जास्तीत जास्त वापर करावा. याकरिता केंद्र शासनाच्या उर्जा मंत्रालयांतर्गत असलेल्या EESL (Energy Efficiency Service Limited) या सार्वजनिक उपक्रमाचे

तसेच राज्य शासनाच्या अधिपत्याखालील महाउर्जा (MEDA-Maharashtra Energy Development Agency) यांचे सहकार्य घेण्यात यावे. सौर उर्जा वापराच्या अनुषंगाने काही यंत्रणा उभारणी करणे आवश्यक असल्यास त्याकरिता येणा-या खर्चाची तरतूद प्रकल्पाच्या पुढील सुधारित प्रकल्प अहवालात करुन त्यास प्रचलित कार्यपध्दतीनुसार विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाकडून सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घ्यावी. याकरिता मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नाही.

६) सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या विविध टप्प्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहीत धरता येणार नाही.

७) या योजनेबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशी व इतर चौकश्यांची कार्यवाही पुढे चालू ठेवावी. या प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे सदर चौकश्यांच्या कार्यवाहीस बाधा पोहोचणार नाही.

या प्रकल्पाच्या कामावरील खर्च मागणी क्र. आय-५, मुख्य लेखाशीर्ष ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च,(१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना कर्जे, योजनांतर्गत(०२)(०२) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान(मोठे प्रकल्प)(४७०१ एच ६६५) या खाली खर्ची घालावा व शासनाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. १७१/२०१७/ १४३४, दि.१५.११.२०१७ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. २८१/२०१७/व्यय-१२, दि.४.१२.२०१७ अन्वये सहमती दिल्यानुसार निर्गमित करण्यात येत आहे. या योजनेस प्रदान करण्यात आलेल्या सुधारित प्रशासकीय मान्यतेची नोंद मोठे प्रकल्प-२ कार्यासनाच्या प्रशासकीय मान्यता नोंदवहीमध्य सन २०१८-१९ अ.क्र. १ वर घेण्यात आली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५०४१६३५५३७६२७ असा आहे.हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dharane Mallikarjun Irappa

Digitally signed by Dharane Mallikarjun Irappa
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42153c779eba7d6ca17364b6d37857b105b20a01d36c767c7ed1d7d278837bd7, cn=Dharane Mallikarjun Irappa
Date: 2018.05.04 16:42:12 +05'30'

(म. ई. धरणे)

शासनाचे उप सचिव

सहपत्र : परिशिष्ट -अ

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

३) सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

४) मा.विरोधी पक्ष नेते,विधानसभा / विधानपरिषद/ विधानमंडळ, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई

५) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.

६) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.

७) वित्त विभाग (व्यय-१२), मंत्रालय, मंबई-३२.

८) नियोजन विभाग (कार्यासन १४३४), मंत्रालय, मंबई-३२.

९) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.

१०) महासंचालक, संकल्पचित्र, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व धरण सुरक्षा, नाशिक

११) मुख्य अभियंता ,जलसंपदा विभाग, अमरावती.

१२) आंतर वित्त सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१३) अधिक्षक अभियंता, बुलढाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, बुलढाणा.

१४) जिल्हाधिकारी, बुलढाणा.

१५) उप सचिव (निवसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मंबई-३२.

१६) अर्थ शाखा १ व २, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मंबई-३२.

१७) कार्यासन मोप्र-२ संग्रहार्थ.

परिशिष्ट-अ

शासन निर्णय क्र. सुप्रमा २०१७/(४१४/१७)/मोप्र-२, दिनांक ०३/ ०५/२०१८ चे सहपत्र

खडकपूर्णा पाटबंधारे प्रकल्प, ता.देऊळगांव राजा, जि.बुलढाणा या प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकातील उपशीर्ष निहाय तरतूदीचा गोषवारा

अ.क्र.	अंदाजपत्रकातील उपशीर्ष	चतुर्थ सु.प्र.मा. नुसार किंमत लक्ष रु.	
१	ए -प्राथमिक	३१५.७५	
२	बी -जमिन	४००८५.२१	
३	सी -कामे		
अ)	शीर्ष कामे	१९९६३.७४	
ब)	अस्तरीकरण	५६०३.८३	
क)	उपसा सिंचन योजना	२२६६९.६८	
४	डी -विमोचक	८९६.०७	
५	एफ-आर एच टी कामे (C.D.	९२१७.४४	
६	जी - पुल	१८५६.७०	
७	एच-एस्केप Escape	४३४.५०	
८	के - इमारती	५२७.५४	(दरसूची जलसंपदा विभाग व सा.बां.वि सन २०१६-१७)
९	एल-मातीकाम	५४७९.८५	
१०	एम-वृक्षारोपण	१४९.१४	
११	ओ-संकिर्ण	२५६.९६	
१२	पी - देखभाल-दुरुस्ती	८९.२८	
१३	क्यु- हत्यारे व सयंत्रे	२९.४९	
१४	आर- दळणवळण	५६४.२१	
१५	यु- वितरीका	१२७३७.३२	
१६	व्ही- पाटचा-या (वाटर कोर्सेस)	८६७४.६१	
१७	डब्ल्यू- ड्रेनेज	२९७.५३	
१८	एक्स - पर्यावरण	६८.८९	
	एकूण	**१२९९१७.७४**	
	अनुषंगीक खर्च	७५४०.००	
	एकूण	**१३७४५७.७४**	